RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. २९ जून 2026



१९२८- समता पाक्षिक डॉ. बाबासाहेबांनी प्रसिद्ध केले.
१९३२- मध्य प्रांतीय दलित परिषद.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

सोमवार २९ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १७९ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Monday, 29 June 2026 | Year : 6 | Issue : 179 | Daily | Rate: Rs. 5/-

# जंतरमंतरवर सोनम वांगचुक यांचे बेमुदत उपोषण

## प्रशासनाची कारवाई, पाणी अन्न शौचालय केले बंद! 'CJP'



**नवी दिल्ली :** स्पर्धा परीक्षांमधील घोटाळ्यांविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी जंतरमंतर येथे बेमुदत उपोषण सुरू केले आहे. मात्र, उपोषण सुरू होताच दिल्ली पोलिसांनी या ठिकाणची पाणी आणि स्वच्छता सुविधा शौचालय बंद केल्याचा आरोप 'कॉकरोच जनता पार्टी' या संघटनेने केला आहे.

'CJP' चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी रविवारी 'X' (ट्विटर) वर पोस्ट करत प्रशासनावर निशाणा साधला. त्यांनी लिहिले, "सोनम वांगचुक यांनी उपोषण सुरू करताच दिल्ली पोलिसांनी जंतरमंतरवरील स्वच्छता सुविधा बंद केल्या आहेत. तिथे ना पाण्याची सोय आहे, ना स्वच्छतेची. वांगचुक यांचे वय आणि प्रकृती पाहता पोलिसांनी सहकार्य करावे अशी विनंती आम्ही वारंवार केली, पण पोलीस ऐकत नाहीत. इतर मूलभूत सुविधाही बंद केल्या जातील अशी आम्हाला भीती आहे.

NEET पेपर लीक आणि स्पर्धा परीक्षांमधील इतर घोळांमुळे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी 'CJP' गेल्या २० जूनपासून जंतरमंतरवर धरणे आंदोलन करत आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि दोन महत्त्वाच्या मागण्यांसाठी

> वांगचुक यांनी उपोषण सुरू केले तेव्हा जंतर-मंतर परिसरात शेकडों तरूण, विद्यार्थी उपस्थित होते. काही शेतकरी नेतेही आवर्जून आंदोलनस्थळी दाखल झाले. वांगचुक यांनी उपोषण करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. आधीपासून लडाखमधील आंदोलनात सहभागी असताना सीजेपीला साथ देण्याविषयी लोक मला विचारतात. जवळपास ४० वर्षांपासून माझ्यादृष्टीने शिक्षण हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. शिक्षणव्यवस्थेशी निगडीत मुद्द्यांवरून युवक आवाज उठवत असताना मी स्वस्थ कसा बसू शकतो? त्यांना मी पाठिंबा देणे अतिशय स्वाभाविक आहे. मुलांचे आयुष्य घडवण्यासाठी आणि देशाला दिशा देण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करण्यावर फोकस असायला हवा. लडाखचा विचार करता हिमालयाचे रक्षण ही सर्वांचीच जबाबदारी आहे. कारण, त्या विभागातून उगम पावणाऱ्या पाण्यावर मोठ्या संख्येने लोक अवलंबून आहेत. सरकारने संवेदनशीलता दाखवली असती तर आम्हाला येथे ठिय्या देण्याची गरज भासली नसती. उत्तरदायित्वाचा अभाव असल्याने लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलन हा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. त्याच पर्यायाचा अवलंब आम्ही करत आहोत, असे ते म्हणाले

सोनम वांगचुक यांनी २८ जूनपासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे. देशाच्या शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित व्हावी. आणि लडाखला अधिक स्वायत्तता आणि तिथल्या पर्यावरणाला कायदेशीर संरक्षण मिळावे. या त्यांच्या मागण्या आहेत. शासनाने या दोनपैकी कोणत्याही एका मागणीवर सकारात्मक पाऊल उचलले, तरी आपण उपोषण मागे घेऊ, असे वांगचुक यांनी आधीच स्पष्ट केले होते. परंतु, सरकारने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने त्यांनी उपोषणाचे अस्त्र उपसले. उपोषणाला बसण्यापूर्वी वांगचुक आणि अभिजीत दिपके यांनी राजघाटावर जाऊन महात्मा गांधी यांना अभिवादन केले. या आंदोलनात शेकडो विद्यार्थी, तरुण आणि नागरिक सहभागी झाले आहेत. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाबमधून येणाऱ्या अनेक शेतकरी नेत्यांना पोलिसांनी त्यांच्या घरातच नजरकैदेत ठेवल्याचा आरोपही अभिजीत दिपके यांनी केला आहे. परीक्षांमधील गोंधळामुळे आणि फेरपरीक्षांमुळे आतापर्यंत २१ हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा दावाही या आंदोलकांकडून करण्यात आला असून, जंतरमंतरवर या विद्यार्थ्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक छोटे स्मारकही उभारण्यात आले आहे. CJP ने शिक्षण क्षेत्रात सुधारणा व्हावी यासाठी **"प्रधान गो बॅक"** मोहीमही सुरू केली

# टीईटी पेपरफुटी प्रकरणी तिन्ही आरोपींना पोलीस कोठडी

**ठाणे :** शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना भिवंडी न्यायालयाने ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, प्रश्नपत्रिका छापखान्यातील कर्मचारी ते परीक्षा केंद्रांपर्यंत वाहतूक करणाऱ्या संबंधित व्यक्तींचीही चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

टीईटी पेपरफुटी प्रकरणात ठाणे पोलिसांनी राजीव शाव, आकाश कुमार आणि धीरज सिंग या तिघांना भिवंडी परिसरातून अटक केली होती. या तिघांनी प्रश्नपत्रिका नेमकी कुठून मिळवली, ती कोणाच्या माध्यमातून मिळाली आणि पेपरफुटीच्या या साखळीत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. रविवारी दुपारी तिन्ही आरोपींना भिवंडी न्यायालयात न्यायाधीश एस. एम. सुतार यांच्यासमोर हजर करण्यात आले. यावेळी तपास अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विजय मराठे यांनी न्यायालयासमोर आरोपींकडून महत्त्वाची माहिती मिळवणे आवश्यक असल्याचे सांगितले. टीईटीच्या प्रश्नपत्रिका कुठून आणण्यात आल्या, त्या कोणत्या पद्धतीने मिळवण्यात आल्या, त्यासाठी कोणाशी संपर्क साधण्यात आला तसेच आर्थिक व्यवहार कशा प्रकारे झाले, याचा तपास करायचा असल्याने पोलिसांनी आरोपींची १० दिवसांची पोलीस कोठडी मागितली. दरम्यान, आरोपी आकाश कुमार आणि राजीव शाव यांच्या वतीने वकील शैलेश गायकवाड यांनी, तर धीरज सिंग याच्या वतीने दिल्लीतील वकील सतेंद्र रेढू यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने तिन्ही आरोपींना ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. तिघेही आरोपी बिहार आणि हरियाणा राज्यातील असल्याने त्यांना टीईटीच्या प्रश्नपत्रिका नेमक्या कोणत्या माध्यमातून आणि कोणाच्या मदतीने प्राप्त झाल्या, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. प्रश्नपत्रिका फुटीमागे मोठे जाळे कार्यरत आहे का, याचाही तपास सुरू आहे. येत्या काही दिवसांत प्रश्नपत्रिका छपाई कारखान्यातील कर्मचारी, प्रश्नपत्रिकांची वाहतूक करणारे कर्मचारी तसेच या प्रक्रियेशी संबंधित इतर व्यक्तींची चौकशी केली जाणार आहे. या चौकशीतून प्रश्नपत्रिका बाहेर काढण्यात कोणाचा सहभाग होता, याचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

**महाराष्ट्र टीईटी पेपर लीकवरून विरोधकांना यांनी भाजपला फटकारले परीक्षा रद्द**
नीट पेपरफुटीनंतर, आता टीईटी पेपरफुटीच्या बातमीने पुन्हा एकदा देशभरात संतापाची लाट उसळली आहे. नीट यूजी पेपरफुटीमुळे तरुणांमध्ये आधीच संताप निर्माण झाला होता आणि आता टीईटी पेपरफुटीच्या बातमीने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. यानंतर, महाराष्ट्रात होणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६, परीक्षेपूर्वी पेपरफुटी झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आली. एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी भाजप सरकारवर निशाणा साधला असून, काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनीही सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.



## महत्वाच्या बातम्या

### सौदी अरामकोच्या हेलिकॉप्टरच्या अपघात १४ नागरिकांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** सौदी अरेबियातील रास तनुरा शहरात सौदी अरामकोचे या तेल कंपनीचे हेलिकॉप्टर कोसळले. या भीषण अपघातात १४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती तिथल्या सरकारी वृत्तसंस्थेने दिली आहे. सौदी अरेबियाच्या ऊर्जा मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे की, संबंधित अधिकाऱ्यांमार्फत या अपघातामागील कारणांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हे हेलिकॉप्टर रविवारी (२८ जून) सकाळी ६:०० वाजता कोसळले. सौदी अरेबियाच्या आखाती किनारपट्टीवर असलेले रास तनुरा हे एक प्रमुख तेल आणि औद्योगिक केंद्र आहे. तसेच, सौदीची प्रमुख सरकारी तेल कंपनी 'सौदी अरामको'चे मुख्य प्रकल्प याच ठिकाणी आहेत.

### प्रत्येक प्रशासकीय अधिकारी आज RSS चा भाग बनलेत... : कैलाश विजयवर्गीय

**भोपाळ :** भाजपा सरकारमध्ये आल्यापासून प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेले आहेत हे दाखवण्याची चढाओढ लागली आहे. संघटनेत आता खूप गर्दी झालीय. चांगल्या लोकांची कमतरता आहे असं विधान भाजपा नेते आणि मध्य प्रदेशचे मंत्री कैलाश विजयवर्गीय यांनी केले आहे. विजयवर्गीय यांच्या या विधानावरून नव्या वादाला तोंड फुटलं आहे. आरएसएसच्या माजी प्रचारकाच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. त्याठिकाणी कैलाश विजयवर्गीय यांनी केलेले विधान आता सोशल मीडियात व्हायरल झाले आहे आणि विरोधकांनी यावर प्रश्नचिन्ह उभे केले आहेत.

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सेशेल्सचा सर्वोच्च सन्मान गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन पुरस्कार प्रदान केला आहे. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासातील कामगिरीसाठी सेशेल्सने हा सर्वोच्च सन्मान दिला असून, यामध्ये हवामान कृती (क्लायमेट ॲक्शन), हरित विकास (ग्रीन ग्रोथ) आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांची दखल घेण्यात आली आहे. शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण आणि ब्लू इकॉनॉमी (सागरी अर्थव्यवस्था) बद्दलच्या दीर्घकालीन कामाची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या मानपत्रात लहान विकसनशील देशांना त्यांनी दिलेला पाठिंबा, हवामान लवचिकता, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि महासागराच्या संसाधनांचे जबाबदार व्यवस्थापन या बाबींचा गौरव करण्यात आला आहे. तसंच यातून भारत आणि सेशेल्समधील दृढ होत चाललेल्या भागीदारीवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. या बहुमानाबद्दल भावना व्यक्त करताना पंतप्रधान मोदींनी एक्सवर एका पोस्टमध्ये म्हटले, "गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन पुरस्कार स्वीकारताना मला अत्यंत नम्र वाटत आहे.

## काँग्रेसचा 'व्हीबीजेआय रामजी कायद्या'वरून मोदी सरकारवर निशाणा



**नवी दिल्ली :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) बदलून केंद्र सरकारकडून १ जुलैपासून लागू करण्यात येत असलेल्या 'डेव्हलपमेंट इंडिया - रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) कायद्या'वरून राजकारण तीव्र झाले आहे. काँग्रेस पक्षाने या नवीन कायद्यावरून मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. पक्षाचा आरोप आहे की, हा नवीन कायदा ग्रामीण मजुरांचे हक्क कमकुवत करेल आणि राज्यांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकेल. काँग्रेसने असा दावा केला आहे की, अनेक राज्यांनीही या नवीन कायद्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, मोदी सरकारने व्यापक चर्चा आणि पुरेशी विचारपूस न करता मनरेगा रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी असा आरोप केला की, या विषयावर ग्रामीण विकासविषयक संसदीय स्थायी समिती, राज्य सरकारे आणि इतर संबंधित घटकांशी गांभीर्याने चर्चा झाली नाही. जयराम रमेश म्हणाले की, आता १ जुलैपासून नवीन कायदा लागू होणार असल्याने अनेक राज्यांनी विविध तरतुदींवर आक्षेप घेतला आहे. जयराम रमेश यांच्या म्हणण्यानुसार, मध्य प्रदेश, बिहार आणि उत्तराखंडसारख्या राज्यांनी या योजनेमुळे त्यांच्यावर लादल्या जाणाऱ्या अतिरिक्त खर्चाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या दाव्यानुसार, या राज्यांनी म्हटले आहे की, नवीन कायद्यामुळे राज्य सरकारांवरील आर्थिक दबाव वाढू शकतो. काँग्रेसने म्हटले आहे की, ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांचे गृहराज्य असलेल्या मध्य प्रदेशनेही या योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काँग्रेसचा दावा आहे की, चार राज्य सरकारांनी कृषी हंगामाच्या ऐन हंगामात योजनेतील प्रस्तावित 'ब्लॅकआउट कालावधी'ला विरोध केला आहे.

# एमडीएमकेमधील १५० हून अधिक नेते डीएमकेमध्ये सामील



**चेन्नई :** रविवारी एमडीएमकेला मोठा राजकीय धक्का बसला. पक्षाचे १५० हून अधिक अधिकारी आणि नेते औपचारिकपणे डीएमकेमध्ये सामील झाले. यामध्ये राज्यस्तरीय नेते, जिल्हा सचिव, वकील आणि विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पक्षाध्यक्ष वायको यांच्या नेतृत्वाखालील एमडीएमकेच्या सर्वसाधारण परिषदेने डीएमकेसोबतची युती संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही घडामोड घडली. पक्षाध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्या उपस्थितीत, अण्णा अरिवलयम येथील डीएमकेच्या मुख्यालयात आयोजित एका समारंभात नेते डीएमकेमध्ये सामील झाले. ही घडामोड एमडीएमकेसाठी एक मोठे राजकीय नुकसान मानली जात आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये मजबूत पकड असल्याने डीएमकेचे वर्चस्व वाढले आहे.

डीएमकेमध्ये सामील झालेल्यांमध्ये शिवगंगाचे पुलवर एस. सेवांथियप्पन, तिरुवल्लूरचे टी.आर.आर. सेंगुट्टुवन, प्रोपरनकुंद्रम अलगुसुंदरम आणि विरुधुनगरचे आर.एम.एस. शेखर यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांचा आणि जिल्हा सचिवांचा समावेश आहे. डीएमकेच्या या प्रवेशामुळे शिवगंगा, तिरुवल्लूर, विरुधुनगर आणि तिरुप्पूर जिल्ह्यांमध्ये पक्षाची स्थिती अधिक मजबूत होईल, असे म्हटले जाते.

याव्यतिरिक्त, तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठातील ४० विद्यार्थी डीएमकेमध्ये सामील झाले आहेत. एमडीएमकेचे विद्यार्थी आणि युवा कार्यकर्त्यांनी डीएमकेमध्ये सामील होण्यासाठी उचललेले हे एक संघटित पाऊल म्हणून पाहिले जात आहे. दरम्यान, शनिवारी एमडीएमकेच्या सर्वसाधारण परिषदेच्या बैठकीत मंजूर झालेल्या एका ठरावात म्हटले आहे की, ४ मे २०२६ रोजी तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर, पडद्यामागील राजकीय तडजोडी जनतेच्या कौलाच्या विरोधात गेल्याचे उघड झाले आहे.

## कर्नाटकात सर्व पान मसाला आणि गुटखा उत्पादनांच्या विक्रीवर बंदी : मुख्यमंत्री



**बंगळूरु :** मुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी कडक इशारा दिला आहे की, कर्नाटकात विकल्या जाणाऱ्या कोणत्याही पान मसाला किंवा गुटख्यामध्ये मादक पदार्थांचा अंश जरी आढळल्यास, त्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात येईल. रविवारी बंगळूरच्या कांतिरवा इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित राजीव गांधी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या ३१ व्या स्थापना दिनाच्या सोहळ्यात आणि 'ड्रग फ्री इंडिया' अभियानाच्या कार्यक्रमात बोलताना शिवकुमार यांनी हे विधान केले. मुख्यमंत्र्यांनी बंगळूरला वातानुकूलित शहर असेही संबोधले. ते म्हणाले, 'मला अशी माहिती मिळाली आहे की, पान मसाला, गुटखा, सुपारीपासून बनवलेले पदार्थ आणि इतर तत्सम वस्तू बाजारात नशा आणणारे पदार्थ मिसळून विकल्या जात आहेत. जर हे खरे असेल आणि हे तात्काळ थांबवले नाही, तर कर्नाटकात सर्व पान मसाला आणि गुटखा उत्पादनांच्या विक्रीवर बंदी घातली जाईल.' ते म्हणाले, 'आमचे ध्येय व्यसनमुक्त कर्नाटक घडवणे आहे. म्हणूनच आम्ही अशा कार्यक्रमांचे आयोजन करत आहोत. 'व्यसनमुक्त भारत' अभियानाला पुढे नेण्यासाठी मी तुम्हा सर्वांचे स्वागत करतो. तुम्ही सर्व या अभियानाचे राजदूत आहात. व्यसनाधीनता रोखणे हे एक मोठे आव्हान आहे आणि तरुण पिढी व्यसनाच्या जाळ्यात अडकणार नाही, हे आपण सर्वांनी मिळून सुनिश्चित केले पाहिजे. ही आपली जबाबदारी आहे. जीव वाचवण्यासारखे उदात्त कार्य निवडल्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो.'

## सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमचा चेहरामोहरा बदलला



**नवी दिल्ली :** देशाच्या सर्वोच्च न्यायालयाकडून एक मोठी बातमी येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमचा चेहरामोहरा बदलला आहे. न्या. जे.के. माहेश्वरी आज, रविवारी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या जागी न्या. पी.एस. नरसिंह यांची कॉलेजियमचे नवे सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. ते सर्वोच्च न्यायालयाचे पाचवे सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश आहेत. न्या. नरसिंह हे २ मे २०२८ पर्यंत या अत्यंत शक्तिशाली कॉलेजियमवर राहतील आणि त्याच दिवशी ते सेवानिवृत्त होतील. दरम्यान, न्या. माहेश्वरी यांनी जवळपास पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर आज राजीनामा दिला. न्या. माहेश्वरी यांच्या निवृत्तीनंतर, सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमची आता पुनर्रचना करण्यात आली आहे. या पाच सदस्यीय कॉलेजियममध्ये आता देशातील काही अत्यंत प्रतिष्ठित न्यायाधीशांचा समावेश आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत या नवीन संघाचे नेतृत्व करत आहेत. न्या. विक्रम नाथ, न्या. बी.व्ही. नागरत्न, न्या. एम.एम. सुंदरेश आणि आता न्या. पी.एस. नरसिंह हे त्यांच्यासोबत सामील झाले आहेत. हे पाच सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश आहेत, जे आता भारतीय न्यायव्यवस्थेच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळतील.




## निधन वार्ता

### मनोज अंबर वान्ढरे



**नागपूर :** मनोज अंबर वान्ढरे राहणार शिवशक्ती नगर, यशोधरा नगर यांचे प्रदीर्घ आजारा नंतर दिनांक २८ जून २०२६ रोजी सकाळी निधन झाले आहे.

त्यांचा अंतविधी वैशाली नगर स्मशान भूमीत येथे पार पडला त्यांच्यामागे पत्नी सुकेशिनी मनोज वान्ढरे आणि आणि मोठा आप्त परिवार आहे. ते स्मृतिशेष चरणदास वानखेडे राहणार संजय गांधींनगर यांचे जावई आहेत.डॉ सुनिल भगत, दिनेश दखणे आणि इतर अनेक मान्यवर यांचे निकटवर्तीय आहेत.

# गडचिरोलीत नक्षलवाद्यांचा भूमिगत शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

**गडचिरोली :** जिल्ह्यातील नक्षलविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना आणखी एक मोठे यश मिळाले आहे. महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील बालबेडा जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी जमिनीखाली लपवून ठेवलेला शस्त्रनिर्मिती कारखाना गडचिरोली पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) यांच्या संयुक्त कारवाईत उद्ध्वस्त करण्यात आला. या कारवाईत ५ ते ६ टन वजनाची लेथ मशीन, १५० क्लेमोर व बीजीएल पाईप्स, २२० बारा बोअर पाईप्स तसेच शस्त्रनिर्मितीसाठी वापरले जाणारे मोठ्या प्रमाणातील साहित्य जप्त करण्यात आले. दुर्गम भागातून हे साहित्य बाहेर काढणे अशक्य असल्याने ते घटनास्थळीच सुरक्षितपणे नष्ट करण्यात आले.

सुरक्षा दलांवर मोठे हल्ले घडवून आणणे, निवडणुका किंवा नक्षल सप्ताहाच्या काळात घातपात करणे आणि शस्त्रसाठा वाढविणे या उद्देशाने नक्षलवाद्यांनी हा गुप्त कारखाना उभारल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यापूर्वी २३ आणि २७ मे रोजी अशाच कारवायांमध्ये मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला होता. त्यानंतर



आता या कारवाईमुळे नक्षलवाद्यांच्या रसद व्यवस्थेला आणखी मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. बालबेडा जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी शस्त्रनिर्मितीचे साहित्य दडवून ठेवल्याची गोपनीय माहिती गडचिरोली पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जून रोजी विशेष अभियान पथक (सी-६०), प्राणहिता पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक (बीडीडीएस) तसेच सीआरपीएफच्या जवानांच्या एकूण सहा तुकड्या शोध मोहिमेसाठी रवाना करण्यात आल्या.

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादाविरोधात सुरू असलेल्या सातत्यपूर्ण कारवायांमुळे नक्षल चळवळीचा प्रभाव दिवसेंदिवस कमी होत असल्याचे या कारवाईवरून स्पष्ट होत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वाखाली अप्पर पोलीस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अप्पर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी, पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या देखरेखीखाली विशेष अभियान पथक, प्राणहिता, इंटेलिजन्स सेल, बीडीडीएस आणि सीआरपीएफच्या जवानांनी संयुक्तपणे पार पाडली.

**जमिनीखाली दडवलेला शस्त्रसाठा उघड**
२७ जून रोजी जवानांनी संशयित परिसराला वेढा घालून तपास सुरू केला. बीडीडीएसच्या पथकाने केलेल्या सखोल तपासणीत जमिनीखाली पुरलेला मोठा शस्त्रनिर्मिती साठा उघडकीस आला. यात ५ ते ६ टन वजनाची लेथ मशीन, १५० क्लेमोर व बीजीएल पाईप्स, २२० बारा बोअर पाईप्स, २० रायफल रॉड मेटल पट्ट्या आणि इतर साहित्य आढळून आले. अत्यंत दुर्गम व डोंगराळ भाग असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार संपूर्ण साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले.

“स्वाभिमान गमावून मोठे होण्यापेक्षा, लहान राहून अभिमान बाळगणे चांगले...”



## बहुजन सौरभ संपादकीय

# शताब्दीचे स्मरण नव्हे, नवसंघर्षाचे आवाहन!

सन २०२७ हे वर्ष भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष, समता सैनिक दलाचे शताब्दी वर्ष, 'बहिष्कृत भारत' या ऐतिहासिक वृत्तपत्राचे शताब्दी वर्ष आणि 'समता' वर्तमानपत्राच्या ९९ व्या वर्धापन वर्षाच्या निमित्ताने आपण एका ऐतिहासिक वळणावर उभे आहोत. ही केवळ स्मरणाची संधी नाही, तर आत्मपरीक्षणाची, नव्या दिशेने वाटचाल करण्याची आणि सामाजिक परिवर्तनाच्या अधुऱ्या लढ्याला नवी ऊर्जा देण्याची वेळ आहे. १९२७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेला चवदार तळे सत्याग्रह हा केवळ पाणी पिण्याचा अधिकार मिळविण्यासाठीचा संघर्ष नव्हता. तो माणसाला माणूस म्हणून जगण्याचा, समानतेचा आणि स्वाभिमानाचा उद्घोष होता. 'पाणी' हा विषय नव्हता; 'मानवी प्रतिष्ठा' हा त्याचा केंद्रबिंदू होता. हजारो बहिष्कृत समाजबांधवांनी भीती झुगारून मानवी हक्कांसाठी केलेला तो संघर्ष भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला. याच काळात स्थापन झालेले समता सैनिक दल हे केवळ एक संघटन नव्हते; ते सामाजिक परिवर्तनाचे शिस्तबद्ध, संघटित आणि मूल्याधिष्ठित आंदोलन होते. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी युवकांना संघटित केले. अन्यायाविरुद्ध लढण्याची हिंमत, शिस्त आणि समाजसेवेची प्रेरणा समता सैनिक दलाने निर्माण केली. 'बहिष्कृत भारत' हे डॉ. बाबासाहेबांनी सुरू केलेले वृत्तपत्र म्हणजे वंचित समाजाचा आवाज होते. ज्या काळात मुख्य प्रवाहातील माध्यमे बहिष्कृतांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत होती, त्या काळात बाबासाहेबांनी लेखणीला सामाजिक क्रांतीचे शस्त्र बनवले. शिक्षण, सामाजिक न्याय, राजकीय हक्क, आर्थिक स्वावलंबन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रचार या माध्यमातून झाला. आज माध्यमांची संख्या वाढली असली, तरी सत्यासाठी निर्भीडपणे उभे राहणारी पत्रकारिता किती उरली आहे, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. 'समता' वर्तमानपत्राची ९९ वर्षांची वाटचालही याच परिवर्तनवादी परंपरेचा भाग आहे. समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि संविधानिक मूल्यांचा प्रचार करणे, ही जबाबदारी आजही तितकीच महत्त्वाची आहे. परंतु या ऐतिहासिक स्मृतींच्या पार्श्वभूमीवर आजच्या समाजाचे चित्र पाहिले, तर अनेक गंभीर प्रश्न उभे राहतात. संविधान अस्तित्वात आहे; आरक्षण आहे; शिक्षणाच्या संधी वाढल्या आहेत; अनेक जण उच्च पदांवर पोहोचले आहेत. तरीही समाजातील विषमता, जातीय भेदभाव, अंधश्रद्धा, बेरोजगारी, व्यसनाधीनता, महिलांवरील अत्याचार, शैक्षणिक असमानता आणि सामाजिक विघटन यांसारख्या समस्या कायम आहेत. विशेषतः समाजातील अंतर्गत फूट ही चिंतेची बाब आहे. वैचारिक एकात्मतेऐवजी गटबाजी, व्यक्तिपूजा, स्वार्थी राजकारण आणि परस्पर अविश्वास वाढताना दिसतो. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा संदेश अनेकदा घोषणांपुरता मर्यादित राहिल्याचे चित्र आहे. शिक्षण घेतले, पण सामाजिक बांधिलकी कमी झाली; संघटना निर्माण झाल्या, पण त्यात ऐक्य कमी झाले; संघर्षाची भाषा राहिली, पण त्यामागची मूल्यनिष्ठा क्षीण होत गेली. आजचा युवक डिजिटल युगात जगत आहे. माहितीचा स्फोट झाला आहे; पण ज्ञानाची आणि चिकित्सक विचारांची कमतरता जाणवते. सोशल मीडियावरील अफवा, द्वेषपूर्ण प्रचार आणि अंधश्रद्धा नव्या स्वरूपात समाजात पसरत आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार करणाऱ्या डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची आज अधिक गरज आहे. समाजाच्या वाताहतीचे आणखी एक कारण म्हणजे आर्थिक असमानता. उच्च शिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि कौशल्य विकास याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही, तर सामाजिक न्यायाची लढाई अपुरीच राहील. स्वाभिमान टिकवण्यासाठी आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे, हा डॉ. बाबासाहेबांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. या शताब्दी वर्षानिमित्त केवळ मिरवणुका, व्याख्याने, बॅनर आणि सोशल मीडियावरील शुभेच्छा यापुरते कार्यक्रम मर्यादित राहू नयेत. प्रत्येक गावात संविधान अभ्यास मंडळे सुरू झाली पाहिजेत. युवकांसाठी कौशल्य प्रशिक्षण केंद्रे उभी राहिली पाहिजेत. वाचनालये, अभ्यासिका, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक सलोखा यासाठी व्यापक अभियान राबवले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांचे विचार केवळ जयंतीपुरते नव्हे, तर दैनंदिन जीवनात उतरले पाहिजेत. आज समाजाला पुन्हा एकदा समता सैनिकांची गरज आहे - हातात शस्त्रे घेणाऱ्या नव्हे, तर संविधान, विवेक, ज्ञान, संघटन आणि मानवतेची मूल्ये घेऊन उभे राहणाऱ्या समता सैनिकांची. आज पुन्हा एकदा 'बहिष्कृत भारत'च्या निर्भीड लेखणीची गरज आहे. आज पुन्हा एकदा चवदार तळ्याच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची गरज आहे. शताब्दी वर्ष म्हणजे केवळ इतिहासाचा गौरव नव्हे; तर भविष्याचा संकल्प आहे. आपण डॉ. बाबासाहेबांना खऱ्या अर्थाने अभिवादन करायचे असेल, तर त्यांच्या विचारांवर चालणारा, समतेला सर्वोच्च मूल्य मानणारा, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणारा आणि संविधानाच्या मार्गाने चालणारा समाज निर्माण करण्याचा निर्धार करावा लागेल. इतिहासाचा अभिमान असणे आवश्यक आहे; पण त्याहून अधिक आवश्यक आहे इतिहास घडविण्याची तयारी. चवदार तळ्याचा संघर्ष, समता सैनिक दलाची शिस्त, बहिष्कृत भारतची निर्भीड लेखणी आणि समता वर्तमानपत्राची परिवर्तनवादी परंपरा हीच आपल्या पुढील वाटचालीची दिशा आहे. शताब्दी वर्षाचे खरे स्मरण म्हणजे पुष्पहार घालणे नव्हे, तर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संविधानिक मूल्यांप्रती नव्याने निष्ठा व्यक्त करून कृतीतून सामाजिक परिवर्तन घडविण्याचा संकल्प..●●

# युगप्रवर्तक राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक व आर्थिक क्रांतीपर्व

> **भारतीय इतिहासाच्या गौरवशाली क्षितिजावर ज्या क्रांतीसूर्य राजपुरुषांनी आपल्या प्रखर कर्तृत्वाने आणि पुरोगामी विचारसरणीने समाजपरिवर्तनाची नवी पहाट आणली, त्यामध्ये कोल्हापूर संस्थानाचे अधिपती राजर्षी शाहू महाराज (१८७४-१९२२) यांचे स्थान सर्वोच्च आणि अढळ आहे. कोल्हापूरच्या ऐतिहासिक गादीवर विराजमान झालेला हा छत्रपती पददलितांचा खरा कैवारी, शोषितांचे अश्रू पुसणारा महामेरू आणि खऱ्या अर्थाने रयतेचा राजा होता.**

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला शतकानुशतके जखडून ठेवलेल्या जातीयतेच्या आणि विषमतेच्या श्रृंखला तोडण्याचे ऐतिहासिक कार्य शाहू महाराजांनी आपल्या कार्यकाळात केले. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून महात्मा जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा वारसा जाज्वल्यपणे पुढे नेला आणि आधुनिक भारताच्या पायाभरणीत आपले मोलाचे योगदान दिले. छत्रपती शाहू महाराजांच्या तेजस्वी आणि प्रगल्भ आयुष्याला अभूतपूर्व कलाटणी देणारे वेदोक्त प्रकरण हा केवळ एक धार्मिक वाद नव्हता, तर ती महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीची पहिली ठिणगी होती. स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट वंशज आणि छत्रपती असूनही, केवळ सनातन जातीच्या उतरंडीत शूद्र ठरवून त्यांना त्यांच्या अधिकृत धार्मिक अधिकारांपासून वंचित ठेवण्याचे घोर धाडस तत्कालीन पुरोहितशाहीने केले. जेव्हा भटजींनी महाराजांना वेदोक्त मंत्रांचा अधिकार नाकारून केवळ पुराणोक्त मंत्रांचे पठण केले, या घटनेने त्यांच्या अंतःकरणात अन्यायी व्यवस्थेविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण केला आणि त्यांना जाणीव करून दिली की, जर एका सार्वभौम राजाला या विषमतेचा चटका सोसावा लागत असेल, तर हाल अपेष्टा सहन करणाऱ्या सामान्य बहुजन समाजाची अवस्था काय असेल? येथूनच त्यांच्यातील समाजक्रांतिकारकाचा उदय झाला आणि त्यांनी ब्राह्मण्यवादी वर्चस्वाला थेट आव्हान देण्यास सुरुवात केली. त्यांच्या या दूरदर्शी आणि मानवतावादी धोरणांचे सर्वात जाज्वल्य प्रतीक म्हणजे २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात लागू केलेला आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय होय. त्या काळात, जेव्हा वर्णव्यवस्था आणि जातीभेदाची विषवल्ली समाजात खोलवर रुजलेली होती, तेव्हा राज्यकर्त्याच्या अधिकारातून अशा प्रकारचा निर्णय घेणे हे प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणारे अभूतपूर्व धाडस होते. महाराजांनी ब्राह्मणेतरांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा जो क्रांतिकारी निर्णय घेतला, तो उपेक्षितांच्या आत्मसन्मानाची आणि सत्तेतील सहभागाची पहिली मोठी लढाई होती. आरक्षण ही कोणावर केलेली मेहेरबानी किंवा दया नसून, तो वंचितांचा नैसर्गिक आणि मानवी हक्क आहे; तसेच समाजाचा डोलारा समर्थपणे पेलण्यासाठी सामाजिक समतोल राखण्याचे ते एक प्रभावी साधन आहे, हे त्रिकालाबाधित सत्य त्यांनी शतकापूर्वीच ओळखले होते. म्हणूनच, प्रस्थापित मक्तेदारी मोडून काढणाऱ्या या राजाला भारतातील आरक्षणाचे जनकम्हणून आदराने गौरविले जाते. शिक्षण प्रसार हे अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या समाजाला प्रगतीच्या प्रकाशाकडे नेणारे एक पवित्र व्रत आहे, हे ओळखून राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते प्राशन करणारा माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, हा विचार खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी त्यांनी १९१७ मध्ये कोल्हापूर संस्थानात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा ऐतिहासिक कायदा लागू केला. बहुजन समाज जोपर्यंत शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित राहील, तोपर्यंत गुलामगिरीच्या आणि अज्ञानाच्या बेड्या तोडणे निव्वळ अशक्य आहे, याची त्यांना जाणीव होती. केवळ शाळा स्थापन करून ते थांबले नाहीत, तर ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या हुशार; परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांची होणारी होरपळ त्यांनी जवळून पाहिली होती. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून त्यांनी कोल्हापूर नगरीत विविध जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची साखळी निर्माण केली. या वसतिगृहांनी महाराष्ट्राला अनेक विचारवंत, समाजसुधारक आणि धुरंधर कार्यकर्ते दिले, ज्यांनी पुढे जाऊन सामाजिक चळवळीचे यशस्वी नेतृत्व केले. स्त्रियांच्या उद्धारासाठी आणि स्त्री-मुक्तीसाठी शाहू महाराजांनी घेतलेले कायदेशीर निर्णय हे आजच्या आधुनिक युगातही अत्यंत विस्मयकारक आणि काळाच्या पुढचे वाटतात. त्यांनी १९१७ मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा संमत करून समाजातील एका अत्यंत कडक आणि अमानुष रूढीला सुरुंग लावला. पतीच्या निधनानंतर वैधव्याच्या छायेत आयुष्य कंठणाऱ्या स्त्रियांना त्यांनी सन्मानाने जगण्याचा आणि पुन्हा नव्याने संसार थाटण्याचा कायदेशीर अधिकार बहाल केला. तसेच त्यांनी आंतरजातीय विवाहांनाही राजाश्रय देऊन त्याला कायदेशीर संरक्षण प्रदान केले. तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि त्यांचे होणारे शोषण रोखण्यासाठी त्यांनी कठोर कायदेशीर पावले उचलली; विशेषतः देवदासी प्रथा ही समाजाला लागलेली जी सामाजिक कीड होती, ती समूळ नष्ट करण्यासाठी त्यांनी कायद्याचा जरब बसवला. स्त्रियांनी केवळ चूल आणि मूल या मर्यादित चौकटीत अडकून न राहता शिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, ही त्यांची तीव्र इच्छा होती. शाहू महाराजांचे सर्वात मोठे आणि ऐतिहासिक योगदान म्हणजे त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमधील अफाट बुद्धिमत्ता, प्रखर राष्ट्रभक्ती आणि शोषितांना न्याय मिळवून देण्याची अथांग तळमळ ओळखली आणि त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले. बाबासाहेबांनी आपल्या विद्रोही विचारांच्या प्रसारासाठी सुरू केलेल्या मूकनायक या मुखपत्राला केलेली आर्थिक मदत असो, वा माणगावच्या ऐतिहासिक परिषदेत तुम्हाला तुमचा खरा नेता मिळाला आहे; आणि ते केवळ तुमचेच नव्हे, तर संपूर्ण भारताचे नेतृत्व करतील, असे जाहीर करणे असो; महाराजांनी बाबासाहेबांच्या पाठीशी आपली संपूर्ण शक्ती उभी केली. सामाजिक विषयांप्रमाणेच आर्थिक आणि औद्योगिक नियोजनातही शाहू महाराज अत्यंत प्रगल्भ आणि दूरगामी विचारांचे शिल्पकार होते. कृषी उत्पादनात अभूतपूर्व क्रांती घडवून आणण्यासाठी त्यांनी राधानगरीसारख्या भव्य आणि महत्त्वाकांक्षी धरणाची निर्मिती केली, ज्यामुळे बळीराजाच्या शेताला बारमाही जलसंजीवनी मिळाली. शेतकऱ्यांचे जीवन सुखकर व्हावे आणि ते कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रातून मुक्त व्हावेत, यासाठी त्यांनी सहकारी संस्थांचे एक भक्कम जाळे विणले व अन्नदात्याची सावकारी पाशातून सुटका केली. केवळ शेतीवर विसंबून न राहता औद्योगिक आणि व्यावसायिक प्रगतीही तितकीच अपरिहार्य आहे, हे ओळखून त्यांनी कोल्हापुरात व्यापाराला मोठी चालना दिली. यासाठी त्यांनी 'शाहुपुरी' या सुसज्ज आणि सुनियोजित व्यापारी पेठेची स्थापना केली, जी कालांतराने राज्यातील एक प्रमुख व्यापार केंद्र बनले आणि ग्रामीण भागातील कच्च्या मालाला थेट बाजारपेठेशी जोडून अर्थव्यवस्थेत गतिमानता आली. त्यांची ही दृष्टी भविष्यातील सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचा पाया रचणारी होती. प्रशासकीय आणि आर्थिक सुधारणांसोबतच कला आणि क्रीडा विश्वाचे निस्सीम आस्वादक आणि आश्रयदाते म्हणूनही शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरलेले आहे. कुस्ती या रांगड्या खेळाला त्यांनी दिलेला राजाश्रय अद्वितीय ठरला; त्यांनी कोल्हापूरच्या लाल मातीत कुस्तीची परंपरा रुजवत पैलवानांना प्रोत्साहन देण्यासाठी ऐतिहासिक खासबाग मैदान या जागतिक दर्जाच्या भव्य आखाड्याची निर्मिती केली. त्यांच्या याच क्रीडाप्रेमामुळे आणि दूरदृष्टीमुळे कोल्हापूरला आज कुस्तीची पंढरी म्हणून जागतिक कीर्ती लाभली आहे. केवळ शारीरिक सामर्थ्यालाच नव्हे, तर मनाला प्रफुल्लित करणाऱ्या ललित कलांच्या विकासासाठीही त्यांचे योगदान मोठे होते. संगीत, नाट्य आणि चित्रकला यांसारख्या कलागुणांना त्यांनी उदार हस्ते राजाश्रय देऊन कलावंतांना समाजात मानाचे स्थान आणि सन्मानाने जगण्याची शाश्वती दिली. तत्कालीन काळातील अनेक दिग्गजांना त्यांनी आपल्या दरबारात आश्रय दिला आणि कलेच्या माध्यमातून समाजात प्रबोधन घडवून आणले. या सर्व व्यापक कामगिरीचा ऊहापोह केला असता असे स्पष्ट होते की, राजर्षी शाहू महाराज हे एका नव्या युगाचे निर्माते आणि युगप्रवर्तक होते. त्यांनी आपल्या राजेशाही सत्तेचा आणि अधिकाराचा वापर स्वतःच्या सुखासीनतेसाठी न करता, समाजातील शेवटच्या माणसाच्या कल्याणासाठी आणि अभ्युदयासाठी केला. समता, बंधुता, स्वाभिमान आणि सामाजिक न्याय या शाश्वत मूल्यांवर आधारित निरोगी समाजाची निर्मिती हेच त्यांच्या संपूर्ण जीवनाचे अंतिम ध्येय होते. आजच्या आधुनिक लोकशाहीच्या युगातही शाहू महाराजांचे विचार आणि त्यांनी आखून दिलेली कल्याणकारी धोरणे तितकीच कालसुसंगत आणि मार्गदर्शक आहेत. माणसाला माणूस म्हणून सन्मानाने जगू देणे हीच खऱ्या अर्थाने लोकशाहीची खरी व्याख्या आहे, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले; म्हणूनच ते इतिहासाच्या पानात खऱ्या अर्थाने राजर्षी आणि रयतेचे लाडके लोकराजा म्हणून अनंत काळ अजरामर राहतील. (लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी आणि फुले-शाहू-आंबेडकर व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)●●






भीमराव सरवदे
9405466441

# लोकप्रतिनिधी : समाजसेवक की नोकरदार?

> **भारतीय लोकशाहीचे खरे सामर्थ्य मतदारामध्ये आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार देऊन संविधानाने लोकशाही अधिक बळकट केली आहे. ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत सर्व लोकप्रतिनिधी जनतेच्या मतांवर निवडून येतात. त्यामुळे ते जनतेचे प्रतिनिधी आणि समाजसेवक मानले जातात.**

मात्र, निवडून आल्यानंतर त्यांना मिळणाऱ्या वेतन, भत्ते, पेन्शन आणि विविध सुविधांबाबत अनेक वर्षांपासून समाजात प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सार्वजनिक ठिकाणी, सामाजिक माध्यमांवर आणि विविध चर्चांमध्ये हा विषय वारंवार चर्चिला जातो. त्यामुळे 'लोकप्रतिनिधी हे समाजसेवक आहेत की नोकरदार?' हा प्रश्न गांभीर्याने विचारण्याची वेळ आली आहे. लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींची जबाबदारी जनतेचे प्रतिनिधित्व करणे, विकासकामांना चालना देणे, सरकारला जबाबदार धरणे आणि संविधानाच्या चौकटीत राहून जनहिताचे निर्णय घेणे ही आहे. लोकप्रतिनिधित्व हा रोजगार किंवा सरकारी सेवा नसून जनतेने दिलेली एक लोकशाही जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या सुविधांचे स्वरूप, निकष आणि मर्यादा यावर सार्वजनिक चर्चा होणे आवश्यक आहे. भारतात अनेक सरकारी कर्मचारी, अधिकारी आणि खाजगी क्षेत्रातील कामगार आयुष्यभर सेवा करूनही आज पेन्शनपासून वंचित आहेत. नवीन पेन्शन योजनेमुळे अनेक कर्मचाऱ्यांना निश्चित पेन्शन मिळत नाही. दुसरीकडे, काही लोकप्रतिनिधींना अल्प कालावधीसाठी निवडून आल्यानंतरही पेन्शन आणि इतर सुविधांचा लाभ मिळतो. यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात असमानतेची भावना निर्माण होते. विशेषतः एखादी व्यक्ती नगरसेवक, आमदार आणि नंतर खासदार किंवा विधानपरिषदेचा सदस्य झाली, तर तिला विविध स्तरांवरील निवृत्तीवेतन किंवा सुविधा मिळण्याबाबत प्रश्न उपस्थित होतात. या व्यवस्थेचा फेरविचार होणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींचे वेतन आणि भत्ते किती असावेत, याबाबत स्वतंत्र, पारदर्शक आणि निष्पक्ष यंत्रणा असावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. कारण स्वतःच्या वेतन-भत्त्यांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार लोकप्रतिनिधींनाच असल्याने हितसंबंधांचा संघर्ष निर्माण होऊ शकतो. लोकशाहीत अशा निर्णयांमध्ये अधिक पारदर्शकता आणि जनतेसमोर उत्तरदायित्व अपेक्षित असते. आज मतदाराला पाच वर्षांत एकदाच मतदान करण्याची संधी मिळते. मतदानानंतर निवडून आलेल्या प्रतिनिधीने आपल्या आश्वासनांपासून फारकत घेतली, पक्षांतर केले किंवा जनतेच्या अपेक्षांप्रमाणे काम केले नाही, तर मतदाराकडे त्याला थेट जबाबदार धरण्याची प्रभावी यंत्रणा नाही, अशी भावना अनेक नागरिक व्यक्त करतात. म्हणूनच लोकप्रतिनिधी अधिक उत्तरदायी कसे होतील, यावर व्यापक राष्ट्रीय चर्चा होण्याची गरज आहे. लोकशाहीमध्ये उत्तरदायित्व हा मूलभूत सिद्धांत आहे. गेल्या काही वर्षांत पक्षांतर, आमदार-खासदारांच्या खरेदी-विक्रीचे आरोप आणि राजकीय अस्थिरता यामुळे लोकशाही संस्थांबद्दल नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा घटनांमुळे मतदारांचा विश्वास कमी होतो. मतदाराने एका विचारधारेवर आणि पक्षाच्या जाहीरनाम्यावर विश्वास ठेवून मतदान केलेले असते. त्यामुळे निवडून आल्यानंतर पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींवर अधिक कठोर कायदेशीर आणि नैतिक निकष लागू करण्याची मागणी सातत्याने होत आहे.




शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि कर्मचारी हे समाजाच्या उत्पादन प्रक्रियेचे आधारस्तंभ आहेत. अनेक शेतकरी कठोर परिश्रम करूनही आर्थिक संकटात सापडतात, तर अनेक कर्मचारी मर्यादित वेतनावर आयुष्य घालवतात. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींना मिळणाऱ्या विशेष सुविधांविषयी प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान न्याय आणि समान संधी मिळाल्या पाहिजेत, हा भारतीय संविधानाचा मूलभूत संदेश आहे. आरोग्य सेवांच्या बाबतीतही नागरिकांमध्ये चर्चा होते. देशात केंद्र आणि राज्य सरकारांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था उभारली आहे. लाखो नागरिक सरकारी रुग्णालयांमध्ये उपचार घेतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींनीही शक्य तितक्या प्रमाणात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर विश्वास दाखवून तिच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. सार्वजनिक व्यवस्था सक्षम झाली तर त्याचा लाभ संपूर्ण समाजाला होईल. भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार देते. त्यामुळे कोणत्याही वर्गाला मिळणाऱ्या विशेष सुविधांचे वेळोवेळी पुनर्मूल्यांकन होणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींना त्यांच्या कार्यासाठी आवश्यक मानधन, कार्यालयीन सुविधा आणि प्रवासभत्ते मिळणे योग्य असले, तरी त्याचे स्वरूप जनहित, आर्थिक शिस्त आणि सामाजिक न्याय यांचा विचार करून निश्चित केले गेले पाहिजे. लोकशाही केवळ मतदानावर टिकत नाही; ती जागरूक नागरिकांवर टिकते. नागरिकांनी प्रश्न विचारले पाहिजेत, माहितीच्या अधिकाराचा वापर केला पाहिजे, जनप्रतिनिधींच्या कामाचा आढावा घेतला पाहिजे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. तसेच लोकप्रतिनिधींनीही जनतेपुढे नियमित हिशेब देण्याची आणि पारदर्शकतेने काम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. लोकप्रतिनिधी हे नोकरदार नसून जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून समाजसेवेची भावना, नैतिकता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अपेक्षित असते. त्यांच्या वेतन, भत्ते आणि पेन्शन यासंदर्भातील धोरणेही या तत्त्वांशी सुसंगत असली पाहिजेत. याबाबत मतभेद असू शकतात, परंतु या विषयावर खुली, तथ्याधारित आणि संविधानाच्या चौकटीत राहून राष्ट्रीय चर्चा होणे ही लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यक बाब आहे. शेवटी, लोकशाहीचे खरे बळ जनतेच्या जागरूकतेत आहे. मतदारांनी केवळ मतदानाच्या दिवशीच नव्हे, तर संपूर्ण कार्यकाळात आपल्या लोकप्रतिनिधींच्या कामावर लक्ष ठेवले पाहिजे. लोकप्रतिनिधींनीही सत्ता ही विशेषाधिकार नसून जनतेने दिलेली जबाबदारी आहे, याचे सतत भान ठेवले पाहिजे. समान न्याय, समान संधी, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता या मूल्यांवरच भारतीय लोकशाही अधिक सक्षम आणि विश्वासार्ह बनू शकते.●●



सागर रामभाऊ तायडे
9920403859





## बहुजन मानस

नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
९९७०८७३५६०

# रा. स्व. संघाचे रजिस्ट्रेशन का नाही?

> **संघाचे रजिस्ट्रेशन झालेले नाही आणि त्याने ते करायला हवे यासाठी कर्नाटकाचे गृहमंत्री मयंक खडगे यांनी मोहन भागवतांना पत्र पाठवले आहे की आपली एवढी मोठी संघटना कर्नाटक प्रांतामध्ये आहे तर ही संघटना कशासाठी आहे, तिचा उद्देश काय आहे, तिचे किती सभासद आहे आणि ती रजिस्टर्ड आहे का अशा प्रकारचे एक पत्र मोहन भागवतांना पाठवले आहे आणि मोहन भागवत किंवा संघाचे लोक त्या प्रश्नाला व पत्राला टोलवाटोलवीचे उत्तरे देत आहे आणि सांगत आहे की हिंदू धर्म रजिस्टर्ड नाही म्हणून संघ देखील रजिस्टर्ड नाही.**

तसे पाहिले तर कुठलाच धर्म रजिस्टर्ड नाही आणि संघाचे लोक तर सांगतात की संघ सांस्कृतिक संघटना आहे. मग धर्माचे उदाहरण कशासाठी?

**'रजिस्ट्रेशन कायदा'**

भारतामध्ये इंग्रजांनी 1860 मधे रजिस्ट्रेशन कायदा आणला आणि त्या कायद्यानुसार सर्व संस्था, एनजीओ रजिस्टर करता येतात. रामकृष्ण मिशन ही संस्था 1860 साली रजिस्टर केली होती. रा. स्व. संघ ही सर्वात मोठी एनजीओ आहे अशी शेखी खुद्द प्रधानमंत्र्यांनी मागे मारली आहे. म्हणजे संघ एनजीओ म्हणून रजिस्टर्ड व्हायला हवा. पण धर्माचे उदाहरण देऊन तो आपले एनजीओपण लपवित आहे. खडगे यांच्या प्रश्नाला अशा प्रकारे एनजीओ म्हणून रजिस्ट्रेशन केले तर सर्व वाद थांबतील.

परंतु संघाचे हे उत्तर कुठल्याही कायद्यात बसणारे नाही आणि म्हणून संघ याचे उत्तर देईल असे दिसत नाही. परंतु कर्नाटकचे गृहमंत्री मयंक खडगे हे संघाला पुरून उरत आहे आणि प्रश्नांची सरबत्ती करून संघाला कोंडीत पकडत आहेत आणि संघ त्या कोंडीतून कसे बाहेर पडावे याची आखणी करत असणार. परंतु संघ कायद्याला मानत नाही. याला कारण संघ स्वताला सरकारच्या वर समजतो. राज्याच्या वर म्हणजे सरकारच्या वर समजतो. अर्थात सरकारला दुय्यम समजतो. एवढेच नव्हे तर गोळवलकरांनी म्हटले आहे आम्ही देशाचे मालक आहोत. गोळवलकर म्हणतात संघ हिंदू राष्ट्राचा प्रतिनिधी स्वरूपच नाही तर ते तो हिंदु राष्ट्राचे स्वरूप म्हणून आपल्यासमोर आहे म्हणूनच ही भारताची संपूर्ण भूमी राष्ट्ररूपी संघाची व्हावी 'स्वामित्वाच्या भावनेने' आपण आपल्या घरात सुख समाधानाने राहावे यासाठी तर आपला हा सर्व प्रयत्न आहे भीषणतम आपत्तीतही सुखा समाधानाने आणि वैभवाने आणि स्वाभिमानाने आपल्या या राष्ट्र रूपात आम्ही जीवित राहावे याच हेतूने शक्ती संचयाचा सर्वस्व पणाला लावून केलेला हा आपला प्रयत्न आहे. (श्री गुरुजी समग्र दर्शन, भाग 1, पा.108)

मला वाटते देशांमध्ये अशा प्रकारची ही एकच संघटना आहे जी स्वतःला कायद्याच्या वर समजते व संविधानाला दुय्यम समजते. खरं म्हणजे संघाचे रजिस्ट्रेशन हे 1925 लाच व्हायला पाहिजे होते. कारण इंग्रजांच्या कायद्याप्रमाणे त्यावेळी अनेक संघटना रजिस्टर झालेल्या आहेत उदाहरणार्थ रामकृष्ण मिशन ही 1860 साली नोंदणी झालेली संघटना आहे. मग 1925 मध्ये स्थापन झालेली संघाची संघटना रजिस्टर का करत नाही? मोहन भागवतांचे म्हणणे आहे की ज्याप्रमाणे हिंदू धर्माचे रजिस्ट्रेशन नाही त्याप्रमाणे संघाचे पण रजिस्ट्रेशन नाही. म्हणजे संघ स्वतःला धर्म समजतो की काय? कुठलाही धर्म हा रजिस्टर्ड असू शकत नाही कारण सरकारी कायदा येण्याच्या आधी धर्म स्थापन झालेले आहेत. सरकार आल्यावर मग कायदे लागू होतात ते सगळ्या संघटनांना लागू होतात. संघ धर्म आहे असं कुठल्या नाकाने म्हणू शकतो? संघ हिंदू धर्म मानतो त्या धर्माचे रक्षण करतो हिंदूंना एकत्र करतो अशा प्रकारची भूमिका घेतो म्हणजे संघ धर्म ठरु शकत नाही. आणि त्याच वेळेस तो मनुवादी आहे हे पण सांगतो म्हणून तो संविधानाला मानत नाही.

जे संविधान बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात निर्माण झाले आहे त्याचा राग संघाला आहे. संविधानामध्ये मनुस्मृतीचे कायदे असावे अशा प्रकारची सूचना




गोळवकरांनी केली होती. आणि म्हणून संघाचा संविधानावर राग आहे म्हणजे इथल्या कायद्याला संघ जुमानत नाही.

आजचे संघवादी सरकार देखील त्यांच्यावर दबाव आणू शकत नाही. आजचे प्रधानमंत्री संघाचे स्वयंसेवक आहेत. म्हणजे संघाच्या तालमीत वाढलेले स्वयंसेवक आहे आणि म्हणून त्याची भूमिका ही संघाचीच आहे. म्हणजे संघ म्हणतो की आम्ही रजिस्ट्रेशन करणार नाही तीच भूमिका प्रधानमंत्री मोदी यांना घ्यावी लागणार आहे. कारण ते संघाला बांधील आहे. कॉंग्रेसच्या सत्ता काळात देखील हा प्रश्न निर्माण व्हायला पाहिजे होता. परंतु कॉंग्रेसने याबाबतीमध्ये कानाडोळा केला आणि म्हणून संघाचे फावले. असं म्हणता येईल की संघाला कॉंग्रेसच्या लोकांनी मदत केलेली आहे. म्हणून संघ वाढत गेला आणि तो आपल्या मनमर्जीप्रमाणे वागू लागला.

**'राष्ट्र आणि राज्य'**

गोळवलकरांचे एक प्रसिद्ध पुस्तक आहे, We or Our Nationhood Defined.

त्या पुस्तकात ते राष्ट्र आणि राज्य या दोन संस्थांचा उहापोह करतात आणि दोन प्रकारांमधील भेद सुद्धा सांगतात. ते म्हणतात की राष्ट्र हे राज्याच्या वर असते (नेशन इज अबॉव्ह दी स्टेट.) राज्याच्या वर राष्ट्र असते किंवा सरकारच्या वर राष्ट्र असते. संघाचे लोक राष्ट्र शब्द सातत्याने वापरत असतात. राष्ट्र बनाना आहे राष्ट्र निर्माण करणे आहे वगैरे वगैरे. मोहन भागवत पासून मोदी पर्यंत किंवा त्यांच्या सगळ्या खासदारांपर्यंत अशा प्रकारची मांडणी करत असतात आणि बाकी पक्षाचे लोक मात्र राष्ट्र संकल्पनेबद्दल काही बोलत नाहीत. ते सरकार मध्ये असतात ते सरकार बद्दल बोलतात परंतु राष्ट्र संकल्पनेबद्दल ते अनभिज्ञ असतात. नाही तर संघाच्या हिंदू राष्ट्राला पर्याय द्यायला पाहिजे अशा प्रकारची भूमिका त्यांनी घेतली असती. पण तसे होताना दिसत नाही. सर्व राजकीय पक्ष स्टेट वा राज्य संकल्पनेत, सरकार प्रकारामध्ये मश्गुल आहेत. सरकारच्या वर राष्ट्र असते वा आहे हे त्यांच्या गावीही नाही.

ते संघाच्या हिंदू राष्ट्राचा विचार करत नाही आणि म्हणून संघ फोफावत गेला. 'मनुचा मासा' नावाचे एक पुस्तक अमरावतीच्या प्रा. कु.ल. आणि महाले यांनी लिहिलेले आहे. त्यात मनुचा मासा कसा अक्राळ विक्राळ वाढत गेला याचे विवेचन केले होते. खर म्हणजे त्याच वेळी संघाच्या सैतानी भूमिकेला वेसन घालायला हवी होती. परंतु कॉंग्रेस पक्ष देखील ब्राह्मण वर्चस्ववादी होता म्हणून संघासाठी दोर ढिले ठेवले व या माशाची अफाट वाढ होऊ दिली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'व्हाट कॉंग्रेस अँड गांधी ह्याव डन टू दी अनटचेबल्स' या पुस्तकात ब्राम्हण प्रामुख्याने सत्ताधारी जमात आहे असे म्हटले आहे. गांधी खुनानंतर व नंतरही ज्या बंदी संघावर आणल्या त्यामुळे संघाची शक्ती कमी न होता वाढत गेली. आणि आता तर संघ निर्मित पक्ष सत्ताधारी आहे त्यामुळे मयंक खडगे यांचे आव्हान संघ कसा सामोरे जाणार हे पाहता येईल.

**'संघावर बंदी'**

मयंक खडगे संघावर बंदी आणावी असेही म्हणतात. संघावर आता पर्यंत तिनदा बंदी आणली आहे. पहिली 4 फेब्रुवारी 1948 मध्ये गांधी खुनानंतर. आणि बंदी आणणाऱ्या दिल्ली सरकारने कारण नमूद केले आहे कारण दिले आहे 'डेंजर टू दी पब्लिक पीस'. अर्थात शांतीवरील संकट असे म्हटले आहे. दुसरी बंदी आणीबाणी मध्ये आणली होती आणि तिसरी बाबरी मस्जिद विध्वंसामुळे. याला कारण जातीय हिंसक दंगली करणे दिले आहे. कर्नाटक सरकारने बंदी आणली तरी केंद्रात तसे होणे शक्य आहे?●●

# या भारतात बंधुभाव नित्य वसु दे, मतभेद नसू दे, दे वरची असा दे...

## मंगलवाटा



सम्राट माटे (मंगलदर्शी)
मो.9075113644

संपूर्ण भारतामध्ये मानवाच्या मनामध्ये नियमित बंधुत्व बंधुभाव सतत असावा. बंधुभाव हा नुसता म्हटल्याने किंवा सांगितल्याने होणार नाही तर समाजातील, देशातील, जगातील, प्रत्येक मानव हा माझा बंधू आहे, त्याच्याशी बंधूतेने व्यवहार करायचे आहे. स्वतःच्या भावावर, बहिणीवर अन्याय झालेला आपल्याला आवडत नाही. त्याच प्रकारे आपणही कुणावर अन्याय करणार नाही. प्रत्येकांच्या सकारात्मक विचारांना सन्मान देऊ. जरी भावाभावाचे विचार पटत नसले तरी आपण आई-वडिलांच्या नेतृत्वात पटवून घेतो. त्याच प्रकारे भारतीयांमध्ये अनेक जाती, धर्म, पंथाचे लोक असले त्यांचे विचारही काही प्रमाणात पटत नसले, तरीही भारत ही आपली माता आहे. येथील अन्न, पाणी, निवारा वापरत असतो. आपण सर्व एक होऊन बंधुत्वाची भावना, सर्वांप्रती कल्याणाची, मंगलमैत्रीची भावना, मनामध्ये रुजवून घेऊ या. याकरीता आपण सर्व कारुण्यमय हृदयातून या देशातील सर्व पंथ व धर्म हे जरी एक होणार नसले तरी, जे काही विचार मानवी कल्याणाचे, समान विचारसरणी स्वीकारु. तरीही मानव द्वेष पसरणारी अकुशल विचारसरणी, जी मानवाला द्वेषाकडे, अहिंसेकडे, विषमतेकडे नेते ती काढून टाकू. समतेकडे, न्यायाकडे, बंधुतेकडे, मैत्रीकडे नेते ती सर्व शिकवण आपण एकत्र येऊन, एकात्मतेची शिकवण आपण भारतातीलच नाही तर संपूर्ण जगामध्ये निश्चितच निर्माण करू. हा असा वर आपल्याला कोणतीही बाहेरीला इश्वरीय शक्ती देणार नाही. तर नियमित मैत्रीचे ध्यान करून, सकारात्मक विचारांचे सतत मनामध्ये पेरणी करून, कुशल गोष्टीचे सतत चिंतन व आचरण करून, हृदयामध्ये नियमित कुशल भावनांचे स्मरण करून, प्रत्यक्ष आचरण करू या. आपण सर्व बाजूला वातावरण निर्मिती करू या. आपल्या कुटुंबाला, समाजाला, देशाला, पर्यायाने जगातील प्रत्येक मानवाला आपण मैत्रीच्या सुवर्णमय धाग्यात एकोप्याने ठेवू शकतो. आपल्या महापुरुषांनी संतानी बंधुत्वाची शिकवण आम्हाला पटवून दिली आहे. मानवतेची व प्रत्येक मानवाला बंधुत्वाची शिकवण देण्यास आजपासून प्रत्यक्ष कार्य करण्यास निश्चितच आपण प्रत्येकाने सुरुवात करूया. यामध्ये आपला परका असा कुठलाही भेदभाव राहणार नाही याची काळजी आपण सर्व घेऊन या...●●

“ नकारात्मक विचार करणे सोडा,
तरच सकारात्मक आयुष्य जगता येईल. ”



# वटपौर्णिमा : परंपरा, पर्यावरण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन

**वटपौर्णिमा हा महाराष्ट्रासह भारतातील अनेक भागांत मोठ्या श्रद्धेने साजरा केला जाणारा पारंपरिक सण आहे. ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी विवाहित स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्याची आणि कुटुंबाच्या सुख-समृद्धीची प्रार्थना करतात. भारतीय संस्कृतीत या सणाला धार्मिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक महत्त्व आहे. मात्र, कोणत्याही परंपरेकडे विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानाने दिलेल्या वैज्ञानिक वृत्तीच्या मूल्यांच्या आधारे पाहणे तितकेच आवश्यक आहे.**



वटपौर्णिमेची परंपरा सावित्री आणि सत्यवान यांच्या कथेशी जोडली जाते. पुराणकथेनुसार सावित्रीने आपल्या बुद्धिमत्ता, धैर्य आणि दृढनिश्चयाच्या जोरावर यमराजाकडून सत्यवानाचे प्राण परत मिळवले. या कथेत सावित्रीचे प्रेम, चिकाटी, आत्मविश्वास आणि संकटांशी लढण्याची वृत्ती अधोरेखित होते. वडाच्या झाडाखाली तिने तपश्चर्या केल्याची आख्यायिका असल्यामुळे वडाच्या वृक्षाला या सणात विशेष स्थान मिळाले. या कथेतून स्त्रीची जिद्द, कुटुंबावरील प्रेम आणि संकटांशी सामना करण्याची प्रेरणा मिळते; परंतु या प्रेरणेला अंधश्रद्धेचे स्वरूप देणे योग्य नाही.

वडाचे झाड हे पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. विशाल आकार, दीर्घायुष्य आणि समृद्ध जैवविविधतेमुळे वडाला भारतीय संस्कृतीत 'जीवनवृक्ष' असेही म्हटले जाते. हे झाड अनेक पक्षी, प्राणी आणि कीटकांना आश्रय देते. त्याच्या सावलीमुळे परिसराचे तापमान कमी राहण्यास मदत होते. पर्यावरण संवर्धनात त्याचे मोठे योगदान आहे. त्यामुळे वडाच्या झाडाची पूजा करण्यापेक्षा त्याचे संवर्धन, संरक्षण आणि नवीन वडाची रोपे लावणे हा अधिक अर्थपूर्ण संदेश ठरू शकतो.

परंतु कालांतराने या सणाभोवती काही अंधश्रद्धा निर्माण झाल्या. झाडाला धागा गुंडाळल्याने पतीचे आयुष्य वाढते, सात जन्म हाच पती मिळतो किंवा पूजा केली नाही तर पतीवर संकट येते, अशा समजुती समाजात रूढ झाल्या. या विश्वासांना कोणताही वैज्ञानिक आधार उपलब्ध नाही. एखाद्या व्यक्तीचे आयुष्य हे पूजा, उपवास किंवा धागा बांधण्यावर अवलंबून नसून त्याची जीवनशैली, आरोग्य, वैद्यकीय सुविधा, मानसिक स्वास्थ्य आणि सामाजिक परिस्थिती यावर अवलंबून असते.

भीतीपोटी किंवा सामाजिक दबावामुळे सण साजरा करणे ही अंधश्रद्धेची सुरुवात असते. 'पूजा केली नाही तर अनर्थ होईल' अशी भीती निर्माण करणे हे श्रद्धेचे नव्हे तर अंधश्रद्धेचे लक्षण आहे. खरी श्रद्धा माणसाला आत्मविश्वास देते, तर अंधश्रद्धा भीती आणि असुरक्षितता निर्माण करते. त्यामुळे श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. या सणाशी संबंधित आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे स्त्रियांमधील भेदभाव. अनेक ठिकाणी विधवा किंवा अविवाहित महिलांना या पूजेत सहभागी होण्यास मज्जाव केला जातो. ही प्रथा सामाजिक समतेच्या आणि मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांना धरून नाही. प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान आणि स्वातंत्र्य मिळणे ही लोकशाही समाजाची मूलभूत अपेक्षा आहे. कोणत्याही स्त्रीवर हा सण करण्याची सक्ती असू नये आणि ज्या स्त्रीला हा सण साजरा करायचा नाही, तिच्या निर्णयाचाही आदर केला गेला पाहिजे. पती-पत्नीचे नाते केवळ धार्मिक विधींवर टिकत नाही. परस्पर प्रेम, विश्वास, संवाद, समानता, सहकार्य आणि एकमेकांबद्दलचा आदर हीच वैवाहिक जीवनाची खरी पायाभरणी असते. आजच्या काळात पत्नी पतीच्या आरोग्यासाठी प्रार्थना करते, त्याचप्रमाणे पतीनेही पत्नीच्या आरोग्याची, शिक्षणाची, सुरक्षिततेची आणि प्रगतीची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. नात्यातील परस्पर सन्मान आणि समानता हीच खरी 'दीर्घायुष्याची पूजा' आहे.



**उमेश चित्ते**
**मो.७७५८८४७१४३**

वटपौर्णिमा अधिक अर्थपूर्ण पद्धतीने साजरी करण्यासाठी काही सकारात्मक उपक्रम राबविता येऊ शकतात. पूजा केल्यानंतर प्रत्येक कुटुंबाने किमान एक वडाचे किंवा इतर स्थानिक वृक्षाचे रोप लावण्याचा संकल्प करावा. पर्यावरण संवर्धनाची शपथ घ्यावी. रक्तदान, आरोग्य तपासणी, वृक्षसंवर्धन, महिला आरोग्य जनजागृती किंवा कुटुंबातील ज्येष्ठांचा सन्मान अशा सामाजिक उपक्रमांशी हा सण जोडला तर त्याचे सामाजिक महत्त्व अधिक वाढेल.

भारतीय संविधानाच्या कलम ५१ (अ) (ह) मध्ये प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि चिकित्सक वृत्ती जोपासणे हे मूलभूत कर्तव्य असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे परंपरेचा आदर करताना विवेकाला सोडून चालणार नाही. धार्मिक किंवा सांस्कृतिक परंपरा जपणे आणि त्याच वेळी अंधश्रद्धांना नकार देणे हे एकमेकांच्या विरोधात नाही. उलट, त्यामुळे समाज अधिक प्रगत, समतावादी आणि वैज्ञानिक बनतो.

आजच्या काळात वटपौर्णिमेकडे नव्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. वडाच्या झाडाभोवती धागा गुंडाळण्यापेक्षा त्याचे संरक्षण करणे, भीतीवर आधारित श्रद्धेपेक्षा वैज्ञानिक विचार स्वीकारणे, केवळ पतीच्या दीर्घायुष्याची कामना करण्यापेक्षा पती-पत्नी दोघांच्याही निरोगी, सुरक्षित आणि आनंदी जीवनासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

परंपरा समाजाला संस्कार देते, परंतु विवेक समाजाला दिशा देतो. म्हणून वटपौर्णिमा हा केवळ धार्मिक विधी न राहता पर्यावरण संरक्षण, स्त्री-पुरुष समानता, आरोग्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संदेश देणारा सण बनला, तर त्याचे खरे सामाजिक महत्त्व अधिक उजळून निघेल.

'वडाची पूजा करण्यापेक्षा वडाचे संवर्धन करा; अंधश्रद्धेपेक्षा वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारा. श्रद्धा जपा, पण विवेक कधीही सोडू नका.' ●●

## हितगुज

### अनंतायन



**ॲड. अनंत खेळकर**
**मो. 9370061677**

मुला-मुलीची पसती झाली. लग्नाचा मुहूर्तही निश्चित झाला. मुलाची आई म्हणाली, 'मला माझ्या भावी सुनेशी एकातात काही बोलायचे आहे.'

त्या दोघी एका खोलीत गेल्या तेव्हा, मुलीची भावी सासू तिच्या डोक्यावरून मायेने हात फिरवीत म्हणाली, 'हे बघ बाळ! माझे लग्न ठरले तेव्हा माझ्या सासुबाईनी मला जे सागितले तेच मी तुलाही सागत आहे.' त्या म्हणाल्या होत्या, कोणत्याही सुनेला कुटुबात फूट पडावी, घरात कलह निर्माण व्हावा असे मुळीच वाटत नसते. उलट ती सुखी ससाराचे स्वप्नच रगवत असते. तसेच सासूचेही आहे. कोणत्याही सासूला आपण आपल्या सुनेचा छळ करावा, कटकटी कराव्या असे चुकूनही वाटत नसते. मग पुढे याच्या विपरीत का होते? तर उत्तर अगदी साधे, सोप्पे आणि सरळ आहे. त्याची बीजे बालपणापासून कळत नकळत आपल्या मनात रुजलेली असतात.

सुनेला वाटते, शेवटी ती सासूच आहे. सासू म्हटले तर ती अशीच वागणार. तसेच करणार, मग सासूच्या कोणत्याही व्यवहाराकडे ती पूर्वग्रहदूषित भावनेने बघू लागते. अगदी तसेच सासूचेही असते. तिला वाटते सून आहे ना? मग तर ती नक्की असेच वागणार! ही अशी दोघीच्याही मनाची समजूतच पुढे कटूता निर्माण करते. म्हणूनच परस्पराविषयीचा गैरसमज दूर होणे गरजेचे आहे. आपण आपले विचार बदलले तर, एकमेकाचे मन जिकता येते. एकमेकाच्या काळजात घर तयार करता येते. तेव्हा आपलेच घर मग स्वर्ग होते. हे मी माझ्या अनुभवातून सागत आहे.' ●●

# शासनाचे एससी आरक्षणातील उपवर्गीकरण म्हणजे आरक्षण विरोधच...

## आगरी कोळी ओबीसीनो तुम्ही कुणाच्या बाजूने जाणार?

**आरक्षणाचा लाभ शोषित वंचित जातीतील शेवटच्या घटकास व्हावा म्हणून एससी अस्पृश्य ठरविलेल्या ५९ जातीतील एकसंघ समूहाचे चार गट करून स्वतंत्र आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासन घेत आहे. या समूहातील धर्मांतरित बौद्ध (पूर्वीची महार) जातीने मातंग जातीचे आरक्षण खाल्ले आहे. असा आरोप ठेऊन वर्तमान देवेंद्र फडणवीस (ब्राह्मण) एकनाथ शिंदे (मराठा) दिवंगत अजित दादा पवार (मराठा) या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे शासन अस्पृश्य जातींचा न्याय करायला निघाले आहे? तर आरक्षणधारी जातींचे ऐक्य कायम रहावे. त्यांची विभागणी होऊ नये म्हणून आंबेडकरी विचारांचे लोक त्याला विरोध करीत आहेत.**




एप्रिल मे मधल्या अत्यंत तप्त उन्हात सुरू झालेली ही लढाई जून महिन्यातल्या पावसात थांबत नाही.उपवर्गी करणाच्या विरोधात बीड जिल्ह्यातील मातंग सोडून इतर जातींचा मोर्चा मातृसत्ताक आगरी कोळी भंडारी मुंबई मध्ये पोहचत आहे.या लाँग मार्चचे मी स्वागत करीत आहे. आपल्याला आठवत असेल. महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात पुढे असलेल्या, पुढारी राज्यकर्त्या मराठा समाजाने आम्हाला ओबीसी आरक्षण मिळावे. यासाठी जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या मराठा मोर्चाला मी जाहीर विरोध केला होता. माझ्या भूमिकेस फार कमी लोकांनी पाठिंबा दिला होता. अर्थात हिंदू मनुस्मृतीचे चातुर्वर्ण्य पद्धतीने स्त्रिया शूद्र अतिशूद्र यांचे केलेले शोषण अनेक हिंदू म्हणविलेल्या जातींतील लोकांना अजूनही पटलेले नाही. या विषयावर लिहिताना बोलताना प्रचंड शिव्या उच्चवर्णीय ब्राह्मण मराठा वैश्य या जातींकडून मला मिळत आहेत. त्यांचे गुलाम झालेले ओबीसी लोकही माझ्या विरोधात बोलत असतात.

अर्थात सामाजिक न्याय न समजलेल्या उच्चवर्णीय हिंदू मानसिकतेच्या लोकांसाठी आरक्षण हा विरोधाचा विषय झालेला आहे. आरक्षणाने देशाची प्रगती थांबली आहे. इतका विकृत प्रचार देशात उच्च जातींकडून सुरू आहे. देशातील ८५टक्के ओबीसी एससी एसटी यांना आपली स्वतःच्या हक्कांच्या, आरक्षणातील भूमिका ठरविणे अवघड झाले आहे. तर आरक्षण विरोधक उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांनी EWS आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक म्हणून स्वतःस घोषित करून, समतेच्या संविधानास मान्य नसलेले आर्थिक दुर्बलांचे आरक्षण, केंद्रातील भाजपच्या सत्तेच्या आधारे मिळविले आहे. तरीही हे शोषक निर्लज्ज लोक हजारो वर्षे शोषित ओबीसी एससी एसटी यांच्या सामाजिक मागासलेपणाचे आरक्षणास विरोध करीत आहेत. आरक्षण समजून घेणे केवळ ओबीसी बांधवांसाठी नाही तर एससी समूहातील पूर्वीच्या महार आताच्या बौद्ध बांधव सोडून इतर ५८जातीना प्रचंड अन्याय अत्याचार उच्चवर्णीयांकडून, सोसूनही अवघड जात आहे.

जंगलात राहणाऱ्या आदिवासी एसटी जातींना हा विषय उच्चवर्णीय हिंदूंच्या विरोधातला म्हणून समजविणार कोण? मी ज्या शूद्र जातीत जन्मलो त्या आगरी ओबीसी जातींनी स्वतःस कट्टर हिंदू म्हणून घोषित केले आहे. त्यां आगरी जातीसाठी सर्वात कठीण गोष्ट स्वतःच्या जातीच्या कल्याणासाठी प्रगतीसाठी प्राणवायू असलेले ओबीसी आरक्षण समजावणे होय. मला ओबीसी आरक्षण हे आंबेडकरी चळवळीने अर्थात प्रामुख्याने बौद्ध बांधवांनी समजावले आहे. तर जन्मापासून वयाच्या पस्तीसी पर्यंत विषमतेच्या संस्कारांची पायभरणी करण्यात, सर्व हिंदू परंपरा, हिंदुत्ववादी विचारांच्या राजकीय पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजप शिवसेना, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल अनेक हिंदू धर्म संप्रदाय कोकणातील स्वाध्याय परिवार, समर्थ संप्रदाय, शेकडो धार्मिक संप्रदायाचा यात वाटा आहे. रामायण महाभारत भगवत गीता, वेद उपनिषदे यांच्या समर्थकांचा यात मोठा सहभाग आहे. या छोट्याशा लेखात मला हे समजावणे गरजेचे आहे. जन्मापासूनच्या मनुस्मृतीच्या हिंदू संस्कारात वाढलेल्या आगरी ओबीसी तरुणास आरक्षण समजून सांगण्यासाठी जे कष्ट आंबेडकरी भावा बहिणींनी घेतले आहेत. ते व्यक्त करायला माझ्याकडचे शब्द कमी पडतील. त्यांच्या अनंत उपकरणाची आठवण मी ठेऊनच हे लिखाण करीत आहे.

हिंदू धर्माच्या तेहतीस कोटी देव, वेद उपनिषदे पुराणे आणि बलवान ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या विषमतेच्या विरोधातील, समता घेऊन लढणाऱ्या महापुरुषांची नावे आम्ही अभिमानाने घेतो.

तथागत बुद्ध, चार्वाक, महावीर महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आगरी समाजातील नारायण नागू पाटील. ॲड दत्ता पाटील, ओबीसी नेते दि बा पाटील अशी अनेक नावे आहेत. परंतु या फार मोठ्या विचारवंताना आजही अपार प्रेमाने माझ्या पर्यंत आणणाऱ्या आंबेडकरी बंधू भगिनीचे उपकार मी कधीच विसरू शकत नाही. आरक्षणात उपवर्गीकरण करून न्याय मिळेल. असे सांगून भांडणे लावणाऱ्या ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या उच्चजातीय लोकांवर विश्वास ठेवू नये. हा त्यांचा शोषक म्हणून असलेला इतिहास आम्ही शोषित ओबीसी एससी एसटी यांनी कायम लक्षात ठेवला पाहिजे.

आम्ही शोषित आहोत. आमचे शोषण वैदिक हिंदू धर्माचे लाभार्थी ब्राह्मण क्षत्रिय मराठा वैश्य यांनी केले आहे. स्वतःच्या अनुभवाने हे मागासवर्गीय बांधवांनी समजून घ्यावे. 'माझे तेच खरे मानावे' हा माझा आग्रह नाही.



**राजाराम पाटील**
**मो. 8286031463**

मुळात आरक्षण हा सामाजिक न्याय आहे. ही गोष्ट प्रत्येक मागास जातीतील त्यांच्या पुढाऱ्यांनी मोठ्या मनाने आपापल्या जात बांधवांना समजावणे गरजेचे आहे. उच्चवर्णीय धार्मिक राजकीय सामाजिक नेतृत्व मागासवर्गीय जातींचे हजारो वर्षे शत्रू आणि शोषक राहिले आहेत. ओबीसी एससी एसटी यांच्या गुलामीवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. आगरी समाजात ॲड जनार्दन पाटील, जनार्दन कोठेकर, ॲड दत्ता पाटील, ॲड दी बा पाटील यांनी आरक्षण समजाविण्याचे प्रयत्न केले. अर्थात हा हिंदू धर्म चिकित्सेचा विषय असल्याने त्यांना प्रचंड विरोध हिंदू धर्मीय लोकांकडून झाला.आगरी नेत्यांना अंधश्रद्धाळू आगरी समाजाचा पाठिंबा मिळत नाही. हे ऐतिहासिक सत्य म्हणजे ब्राह्मणी हिंदू धर्माचा ओबीसी लोकांवर असलेला हिंदू विचारांचा प्रभाव होय. विषमतेचे खंडन करण्यासाठी आपापल्या जातींची वैचारिक गुलामी उघड करून महा दयाळू बुद्धांच्या नव्या विज्ञानवादी, तर्कनिष्ठ विचारांचा परिचय करून देणे हे सर्वांचे काम आहे. आंबेडकरी बौद्ध बांधवांनी आपले सर्वस्व पणाला लाऊन हे राष्ट्रीय कार्य म्हणजे साविधानिक राष्ट्रनिर्माण आपल्या देशात कष्टाने घडविले आहे. त्यांच्या त्यागाची, संघर्षाची प्रबोधनाची तुलना कुणाबरोबर होऊच शकत नाही. कोणत्याही मागास जातीस आरक्षणाचा फायदा घ्यायचा असेल? तर त्यास विरोध करणाऱ्या उच्चवर्णीय जातीबरोबर संघर्ष अटल आहे. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या १५टक्के लोकांकडे धर्म अर्थ काम म्हणजेच धार्मिक सत्ता, राजकीय सत्ता, व्यापार यांची सर्व शक्ती केंद्रित झाली आहे. या संपत्तीचे वाटप मागास ओबीसी एससी एसटी यांना करणे सरकारचे काम होते. सरकार ब्राह्मण मराठा वैश्य यांचे असताना हे काम जीवघेणे झाले आहे. असे असताना? ओबीसी एससी एसटी यांनी एकत्र येऊन लढलो तरच सामाजिक न्याय म्हणजे आरक्षण मिळू शकते.

एससी आरक्षणात विभाजन हे आरक्षणासाठी लढणाऱ्या आमच्या आंबेडकरी विचारांवर मनुवादी हिंदुत्ववादी लोकांचा सरकार पुरस्कृत हल्ला आहे. यावेळी आंबेडकरी बौद्ध बांधवांच्या सामाजिक नेतृत्वास आम्ही साथ देणे. आर्थिक राजकीय सामाजिक सहाय्य करणे हे स्त्रिया शूद्र अतिशूद्र यांचे काम आहे. या चळवळीस आर्थिक सहकार्य करावे. ही नम्र विनंती मी ओबीसी बांधवास करीत आहे. आमच्या गुलामिस कारण जर विषमतावादी वैदिक धर्म असेल तर ती गुलामी समजून घ्या. पुन्हा पुन्हा सांगतो माझे तेच खरे मानू नका.

स्वतःच्या विवेक बुद्धीस विचारा. मी माझे अनुभव सांगत आहे. पुस्तकी पाठांतर नाही. आपल्याला जमीन जंगल समुद्र शिक्षण आरक्षण यांना विरोध हिंदू विचारांचा आहे. माझा हा अनुभव आहे. हा अनुभव तुम्हास होत नाही त्याचे कारण आमचे मन बुद्धीवर त्याचा प्रभाव आहे. आंबेडकरी विचार, सभा, साहित्य, वक्तृत्व हे भारतातले वेगळ्या विचारांचे, समतेचे, मानव मुक्तीचे जग आहे. तेही पाहून घ्या. मग ठरवा. याच मातीत गाडलेला आपलाच समतेचा बंधुतेचा न्यायाचा विचार मातृसत्ताक आई एकविरेचा सुपुत्र भगवान बुद्ध यांनी मांडला. जो आजही आपल्या घरात, मनात लपला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात तो सर्वासाठी सांगितला. अगदी उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य अल्पसंख्यांक, ओबीसी एससी एसटी यांच्या साठी, साऱ्या जगासाठी. त्याच विचारांनी बौद्ध बांधवांची प्रगती झाली. फक्त आरक्षणाने नाही. आरक्षण घेण्यासाठी उच्च शिक्षण गरजेचे आहे. मुंबई विद्यापीठ आगरी कोळी भंडारी लोकांच्या जागेत असूनही आगरी समाजात एकही IAS नाही. हेच दुःख मातंग बांधवांचे आहे. आरक्षण बौद्ध बांधवांनी मिळविले कारण त्यांनी चुकीच्या चालीरीती, मनुस्मृती सोडून, हिंदू धर्म सोडून डॉ बाबासाहे आंबेडकर बुद्ध फुले यांचा विचार स्वीकारला. ज्यांनी सर्वच आरक्षण आणि अख्खा भारत लुटला. ते ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या शोषणकर्त्या लोकांशी समतेच्या मार्गाने, अहिंसक लोकशाही लढाई लढायची आहे. मागास जातींनी आपल्याच भावांशी लढून कसे चालेल? विचार करा सोबत या मी नम्रपणे समजावितो तुम्हाला. स्त्री शूद्र अतिशूद्र यांची गुलामी नष्ट करण्यासाठी आपल्या जातीसाठी गाव गावात शाळा कॉलेज विद्यापीठे काढू. खूप शिकू. महात्मा फुले सावित्री माई यांचा वसा घेऊ. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने सारा भारत एकवीरा पुत्र बुद्धांचा करू. शोषण संपवून समतेचा भारत घडवू. आम्हास हिंदुराष्ट्र नको. संविधानिक राष्ट्र हवे.●●

# देशातील अग्नी सुरक्षा वाऱ्यावर; लोकांचा जीव टांगणीवर!

**लखनौमध्ये कोचिंग सेंटरमध्ये झालेले अग्नितांडव मानवतेसाठी अंगावर शहारे येणारी भयावह घटना आहे. या अग्नीकांड वरून लक्षात येते की, सरकारच्या व प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अशा भयावह घटना दिवसेंदिवस आक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे आणि देशात दररोज कुठे ना कुठे छोटे-मोठे अग्नी तांडव झाल्याचे दिसून येते व यात निरअपराधांचा बळी जात आहे. कारण लखनौमधील कोचिंग सेंटर हे अवैधरित्या चालायचे यामध्ये वाजवीपेक्षा जास्त विद्यार्थी, संपूर्ण नियमांचे उल्लंघन, अग्नी सुरक्षा किंवा आपात्कालीन व्यवस्थेचा अभाव या संपूर्ण गोष्टींचा अभाव लखनौ अग्नीकांडमध्ये दिसून याला आणि याला जबाबदार सर्वप्रथम तेथील प्रशासन व नंतर सरकार.**



नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोचिंग सेंटरवर सरकारने अगोदरच कारवाई केली असती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चौकशी केली असती तर ही दुर्घटना टाळता आली असती. आज सरकार अग्नीकांड पहाता त्या कोचिंग सेंटर मालकावर कारवाई करीत आहे व बुलडोझर ॲक्शन होत आहे हेच काम सरकारने अगोदरच केले असते तर अनेकांचा जीव वाचला असता व आज ही गंभीर स्थिती निर्माण झाली नसती. देशासह राज्यात अनेक काणून-कायदे-नियमावली आहेत परंतु कोणत्याही नियमांचे पालन होत नाही.हे संपूर्ण कायदे-काणून- नियमावली धुव्यावर ठेवून (बाजुला सारुन) प्रशासनाच्या मदतीने (भ्रष्टाचाराच्या मार्गाने) बेधडक अवैध धंदे व कामे सुरू आहेत याचे जिवंत उदाहरण म्हणजे लखनौ अग्नीकांड. यामध्ये सरकारची व संबंधित विभागाची साठगाठ सुध्दा असते. देशातील कोचिंगक्लासेस, हॉटेल, लॉज, सरकारी दवाखाने, खाजगी दवाखाने, फुटपाथ आजही असुरक्षित आहे व याचा परिणाम जीवितहानीमध्ये होतो. आगीच्या दृष्टीकोणातुन कोणतेच ऑडिट गांभीर्याने प्रशासनाकडुन घेतले जात नाही व सरकारही यावर जातीने लक्ष देत नाही. कारण यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो व यात मोठमोठे अधिकारी आणि राजकीय पुढारी सहभागी असतात. याची दुर्गंधी संपूर्ण देशात पसरतांना दिसून येते व त्याचे प्रायश्चित्त दुर्घटनेच्या रूपात सर्वसामान्य व भोळ्याभाबड्या जनतेला जीवीत हाणीच्या स्वरूपात भोगावे लागते व त्याचा परिणाम संपूर्ण परिवारावर होतो. अग्निकांडसारख्या भयावह घटनांवर सरकार चौकशी बसविते परंतु हा सर्व दिखावा असतो. दिनांक २२ जून २०२६ ला लखनौमधील अलिगंज भागात एका तीन मजली व्यावसायिक इमारतीला लागलेल्या भीषण आगीत १५ विद्यार्थ्यांचा गुदमरून व होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला तर अनेक जण गंभीर जखमी झाले आणि ही हृदयद्रावक घटना घडली व कोचिंग सेंटर मृत्यूचे सेंटर बनले. सध्याच्या परिस्थितीत देशात प्रशासनाच्या चुकांमुळे दिवसेंदिवस अग्निकांडच्या घटनांमध्ये वाढ होतांना दिसत आहे. याला कारणीभूत वाढते शहरीकरण व त्यामुळे उत्पन्न होणारी गंभीर परिस्थिती सुध्दा कारणीभूत आहे. उत्तरप्रदेश सरकारने माफीया राज, गुंडाराज यावर बुलडोझर चालविले. परंतु प्रशासनाच्या देखरेखीखाली अवैध कामे सुरू आहे आणि यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे ही बाब सरकारच्या अजूनपर्यंत लक्षात कसे काय आले नाही? सर्वसामान्यांना ज्या मुलभूत सुविधांची गरज आहे त्या सुविधांपासून उत्तर प्रदेशातील जनता व देशातील जनता कोसो दूर असल्याचे नुकत्याच झालेल्या लखनौ अग्नितांडवावरून दिसून येते. असेच अग्नितांडव देशातील अनेक राज्यात झालेले आहेत आणि होत आहेत हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. परंतु त्यांच्यावर देशातील संपूर्ण राज्य सरकारे तात्पुरती कारवाई करून सरकारकडून पांघरूण टाकल्याचे काम केले जाते.३ जून २०२६ ला दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील एका हॉटेलला आग लागली होती यात २१ जनांचा मृत्यू झाला होता, उत्तर गोव्यातील पणजी पासून २५ किमी अंतरावर असलेल्या अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेन या गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइट क्लबला दिनांक ६ डिसेंबर २०२५ ला मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर १६ जण गंभीररित्या जखमी झाले होते, याचप्रमाणे तेलंगाणाची राजधानी हैदराबाद येथील ऐतिहासिक चारमिनारस्थित गुलजार हाऊसच्या एका इमारतीला दिनांक १८ मे २०२५ ला सकाळी भीषण आग लागली होती या भीषण आगीत दुर्दैवाने ८ बालकांसह १७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला होता अशा अनेक अनगिनत भयावह घटना देशातील अनेक राज्यात मोठ्या प्रमाणात होत आहे आणि राज्य सरकारे उघड्या डोळ्यांनी पाहत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. देशातील जनता असुरक्षित का आहे याचे मुख्य कारण म्हणजे देशातील वाढता भ्रष्टाचार. कारण अती संवेदनशील कामाची नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) सरकारकडून भ्रष्टाचाराच्या माध्यमातून सहज उपलब्ध होते आणि त्यातून अशाप्रकारच्या भयावह घटनांचा उदय होतो. आजही देशात अवैध निर्माण, अवैध धंदे मोठ्या प्रमाणात राजकीय पुढाऱ्यांचे आहेत किंवा त्यांच्या चेलेचपाट्यांचे आहेत. आज देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे तर काही भ्रष्टाचारी सरकारमध्ये सहभागी आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर अशोक खरात याचे प्रकरण खूप गाजले यांचा करोडोंचा घोटाळा सरकारच्या निदर्शनास सुध्दा आला. परंतु त्यांच्या मालमत्तेवर सरकारने अजून पर्यंत बुलडोझर चालविले नाही किंवा त्याच्यावर कोणतीही कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही. अशाप्रकारे देशात अनेक भ्रष्टाचारी दिसून येतात व त्यांचे अवैध धंदे दिसून येतात. परंतू यांच्या चुकांचे प्रायश्चित्त देशातील जनतेला मृत्यूच्या रूपात भोगावे लागते. लखनौ अग्नीकांड लक्षात घेता देशातील संपूर्ण राज्य सरकारे जागी झाली आणि महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरमध्ये अग्निशमन विभागाने कारवाईला सुरुवात केली यात १०३ शिकवणी वर्ग (कोचिंग क्लासेस)धोकादायक श्रेणीमध्ये असल्याचे दिसून आले ही फक्त नागपूरची स्थिती आहे यावरून आपण समजू शकतो की, राज्यासह देशातील स्थिती किती भयानक असावी यावरून स्पष्ट होते. देशातील राज्य सरकारे आतापर्यंत झोपून होती. लोकांचा जीव जातो तेव्हा सरकारच्या किंवा संबंधित विभागाला जाग येते ही देशाची शोकांतिका म्हणावी लागेल. त्यामुळे लखनौ अग्निप्रलयातून संपूर्ण राज्य सरकारने व केंद्र सरकारने धडा घ्यावा व जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी. जय हिंद.●●

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# पाऊस लांबला; बळीराजाची चिंता वाढली

**यावर्षी सरासरीपेक्षा कमी आणि उशिरा पाऊस येईल असे भाकीत भारतीय हवामान खात्याने तसेच स्कायमेटने वर्तवले होते. आज ते भाकीत खरे ठरताना दिसत आहे कारण दरवर्षी ७ जूनला येणारा मान्सून अजूनही आलेला नाही. अल निनोमुळे मान्सून लांबला असल्याचे कारण या क्षेत्रातील तज्ज्ञ देत आहे. आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होईल असे हवामान खात्याने सांगितले आहे हा अंदाज खरा ठरावा आणि वरून राजाने कृपा करावी यासाठी बळीराजाने देव पाण्यात बुडवले आहेत. कारण आपल्या देशातील बहुतांशी शेती ही पावसावर आहे.**



सुमारे ६० टक्क्यांहून अधिक शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत. पाऊस लांबल्याने पेरणी लांबली आहे. पेरणी लांबल्याने शेतीचे वेळापत्रकच कोलमडून पडले आहे गेल्या काही वर्षात हे चित्र सातत्याने पाहायला मिळत होते यावर्षी तेच होणार असे एकंदरीत दिसत आहे. यावर्षी जून महिन्याच्या सरासरी १० टक्के इतकाही पाऊस झालेला नाही. राज्यातील खरीप पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ०.७७ टक्केच म्हणजेच केवळ १ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. राज्यात खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १४२.०२ लाख हेक्टर असून ऊस पिकासह हे सरासरी क्षेत्र १५२. ९७ लाख हेक्टर आहे. पाऊस लांबल्याने आता क्षेत्रात पेरणी देखील रखडली आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली आणि पावसाने ओढ दिली तर त्याचा परिणाम केवळ खरीप हंगमावरच नाही तर रब्बी हंगामांवर देखील होऊ शकतो. पाऊस लांबल्याने कृषी उत्पादनाची टक्केवारी अर्थातच कमी होण्याची शक्यता आहे. पाऊस कमी झाला की महागाई वाढते हे समीकरणच आहे. महागाई वाढली की त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. यावर्षी पाऊस लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो? देशातील बावीस कोटी जनावरांचा चारा पावसावरच अवलंबून आहे. जर वेळेत आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर या जनावरांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिह निर्माण होऊ शकते. पोटच्या लेकरांप्रमाणे वढवलेले पशुधन टिकवायचे कसे या विवंचनेत बळीराजा आहे. जर पाऊस वेळेत झाला नाही जनावरांना चारा मिळाला नाही तर देश देशातील दूध उत्पादन घटू शकते परिणामी त्याचा फटका दुग्धजन्य पदार्थांना बसू शकतो. एकूणच पाऊस वेळेत आणि पुरेसा आला नाही तर त्याचा फटका शेतीलाच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेला बसू शकतो. देशाची अर्थव्यवस्था आता कुठे रुळावर येऊ लागली असताना हे संकट उभे राहिले असल्याने या संकटाला सामोरे जाण्यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करायला हवी. मागील काही वर्षांपासून निसर्गचक्र बदलले आहे. पावसाचे प्रमाण आणि महिनेही बदलले आहेत. जेंव्हा नको तेंव्हा पाऊस पडतो आणि जेंव्हा गरज असते तेंव्हा दडी मारतो. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी पूर्ण करतो मात्र त्याचा आपल्या शेतीला काही उपयोग होत नाही उलट नुकसानच होते. देशातील कृषी क्षेत्र नेऋत्य पावसावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. पावसाने हुलकावणी दिल्याने पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन जून महिन्यात अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. धरणातील पाण्याचा साठा संपत आल्याने अनेक ठिकाणी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा पाणीपुरवठा होत आहे. जर ऐन पावसाळ्यात ही अवस्था असेल पुढील उन्हाळ्यात काय अवस्था असेल याची कल्पना जरी केली तरी अंगावर काटा येतो. अल निनोमुळे निसर्गचक्र बिघडले असे म्हटले जात असले तरी याला केवळ अल निनोच जबाबदार आहे असे नाही. याला आपण म्हणजे मानव देखील तितकेच जबाबदार आहे हे मान्य करावे लागेल कारण मानवाने कारण नसताना निसर्गावर अतिक्रमण केले. बेसुमार वृक्षतोड करून सिमेंटची जंगले उभारली. जितके वृक्ष तोडले तितके वृक्ष लावले नाहीत या सर्व बाबी निसर्गाच्या लहरिपणास जबाबदार आहेत. आता तरी आपण सुधारायला हवे. वृक्षतोड थांबवायला हवी. निसर्गात मानवाचा होणारा हस्तक्षेप रोखायला हवा. सरकारनेही पाण्याचे योग्य नोयोजन करायला हवे. शेतकऱ्यांनीही मान्सूनच्या बदलत्या आलेखानुसारच शेतीचे नियोजन करायला हवे.●●



**श्याम ठाणेदार, पुणे**
**9922546295**

## वाचकांचे विचारपिठ

### नेतृव, निष्ठा आणि विरोधी राजकारणाची कसोटी या संपादकीय लेखावर वाचकांचे मनोगत

नेतृव, निष्ठा आणि विरोधी राजकारणाची कसोटी या संपादकीय मध्ये म्हणतात,की अलीकडे नेतृवावर काहींचा, काही कारणाने विश्वास कमी झाल्यामुळे विरोधी पक्षाला राजकारण करतांना खूप मेहनत घ्यावी लागते. आणि त्यात टिकून राहण्यासाठी खरी कसोटी असते. कोण केव्हा आपल्याला सोडून जाईल अलीकडे समजून येणे फार कठीण आहे. ज्यांच्या साठी तुम्ही मेहनत घेता निवडून आणता तो अलीकडे भुर्रर उडून जात आहे.त्यामुळे मतदाराच्या विश्वासाला तडा बसतो. त्यामुळे राजकारण खूप कठीण झाले आहे. जनतेचे मूलभूत प्रश्न अलग, लोकांनी टाकलेला विश्वास गमावणे हे अलीकडे नित्याचेच झालेले पक्ष फुटीरतेमुळे आपल्याला जाणवते. त्यामुळे कार्यकर्त्यांची नेत्यावर प्रचंड पकड असल्याशिवाय लोकांना न्याय मिळणे शक्य नाही.आज निवडून आल्यावर पक्ष बदल मुळे लोकांना चिंता वाटू लागली आहे. त्यामुळे अलीकडे काही टपरीवर बोलतात, 'राजकारण बेशरम माणसाचे काम तर नाही' राजकारणी बेशरम लोकांना जनतेनी वठनिवर आणले पाहिजे ते जनतेच्या हातात आहे.पण अलीकडे पक्ष निष्ठा कमी होतांना दिसते हे मात्र नक्की.महत्व पूर्ण संपादकीय, सोबतच माझा लेख 'बापाला समजून घेण्यासाठी सम्यक दृष्टी हवी' हा लेख दैनिक बहुजन सौरभ मध्ये दिल्याबद्दल संपादिका, प्रा, संध्याताई राजूरकर मॅडम यांचे मनःपूर्वक आभार. सन्मान पूर्वक जयभीम.

**अविनाश टिपले.**

